पाणी पुरवठा योजनांतर्गत लोकसहभाग
प्राप्त करुन घेण्याची पध्दत घालून देण्याबाबत

3U0715

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्र.ग्रापापु १००५/प्र.क्र.१३/पापु ०७,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक १८ फेब्रुवारी २००५**

वाचा: (१) शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र. ग्रापापु १०९९/प्र.क्र.३२८/ पापु ०७, दिनांक २७ जुलै, २०००
(२ )शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र. ग्रापापु १००१/प्र.क्र.१९०/ पापु ०७ ,दिनांक ३ सप्टेंबर,२००१
(३) शासन परिपत्रक,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.ग्रापापु १००२/प्र.क्र.५३२/ पापु ०७, दिनांक २३ मार्च २००२
(४) शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु १००३/प्र.क्र.१६६/ पापु ०७,दिनांक ५ जानेवारी २००४
(५) शासन परिपत्रक,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.ग्रापापु १००४/प्र.क्र.२४४/ पापु ०७,दिनांक १८जानेवारी २००५
(६) शासन शुध्दिपत्रक ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.ग्रापापु१००४/प्र.क्र.२४४/ पापु ०७,दिनांक ८फेब्रुवारी २००५

**प्रस्तावना:**

ग्रामीण पाणी पुरवठा योजना मागणी आधारित, लोकसहभागावर राबविण्याचे धोरण महाराष्ट्र शासनाने दि. २७ जुलै २००० पासून अंगिकारले आहे. या धोरणाच्या अनुषंगाने आवश्यक सूचना संदर्भातील शासन निर्णय, परिपत्रके, इत्यादिव्दारे निर्गमित करण्यात आल्या आहेत. पाणी पुरवठा योजनांसाठी लोकसहभागाची व शासन सहभागाची रक्कम उपलब्ध करुन घेण्याबाबत सूचना संदर्भातील (३) येथील परिपत्रकाव्दारे निर्गमित करण्यात आल्या होत्या.

आदिवासी क्षेत्र व दलीत वस्ती यासाठीच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी लोक सहभागाची रक्कम ५ % करण्याचा तसेच, लोकसहभागाचा काही भाग वस्तुदान, श्रमदान व कौशल्यदान याव्दारे देण्यास शासनाने परवानगी दिल्याने संदर्भातील (३) येथील दिनांक २३ मार्च २००२ च्या परिपत्रकाव्दारे निर्गमित करण्यात आलेल्या लोकसहभाग व शासन सहभाग यांची रक्कम प्राप्त करण्याबाबतच्या शासन परिपत्रकात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:**

संदर्भात ३ येथे नमूद केलेल्या शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र.९ ते १३ येथील सूचनांऐवजी पुढील सूचनानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी लोकसहभाग व शासन सहभागाची रक्कम यापुढे प्राप्त करुन घेण्यात यावी :

१) पाणी पुरवठा योजनेकरिता मागणी करणा-या ग्राम पंचायती / वाडयांच्या प्रस्तावांना निकषाप्रमाणे गुण देऊन **सर्वात जास्त गुण मिळणाऱ्या अर्जदार ग्रामपंचायतींची / वाडयांची**

**प्राथम्य यादी** तयार करण्यात यावी. (सर्वात जास्त गुण प्राप्त ग्रामपंचायत / वाडी सर्वात प्रथम व नंतर गुणांच्या उतरत्या क्रमाने यादी तयार करावी.) प्रस्तावनेतील क्र. ५ येथील शासन परिपत्रकात नमूद केल्यानुसार जिल्हा परिषदेकडे प्राप्त प्रस्तावांच्या ठेवण्यात आलेल्या नोंदणी रजिस्टरमध्ये त्याची नोंद घेण्यात यावी. त्या वर्षात उपलब्ध होणा-या निधीच्या अनुषंगाने, पूर्वीच्या वर्षातील सर्व सुरु कामांना त्या वर्षात आवश्यक निधी विचारात घेऊन, यापैकी प्राधान्य क्रमाने जी गावे सर्वसाधारण क्षेत्रासाठी किमान १०% तर आदिवासी क्षेत्रासाठी व दलित वस्ती कार्यक्रमासाठी किमान ५ % **लोकवर्गणी देण्याचे व १००% देखभाल दुरुस्ती खर्च करण्याचे ठराव**, तसेच शासन निर्णय **दिनांक ३.९.२००१** नुसार इतर ठराव करण्याचा निर्णय घेतील त्यांच्याच योजना मंजूर कराव्यात. **वर्षातील या योजनांचा अग्रक्रम मंजूर करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या शिफारशीनुसार जिल्हा परिषदेतील जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीने घ्यावा. समितीला शासनाने ठरवून दिलेल्या निकषास कोणतीही सूट देऊन योजनांचा प्राधान्यक्रम मंजूर करता येणार नाही.** मुख्य कार्यकारी अधिका-यांनी शासनाच्या निकषानुसार प्राधान्य यादी तयार केली आहे याची पडताळणी करुन उपलब्ध निधीच्या अनुषंगाने ग्रामपंचायतींचा / गावांचा / वाडयांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्याची बाब केवळ ही समिती हाताळेल. योजनांच्या तांत्रिक, प्रशासकीय मंजूरीसाठी व अंमलबजावणीसाठी क्र.२ येथे नमूद शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाही करावी.

(अ) प्राधान्य यादीत नाव आल्यावर ग्रामपंचायतीने / गावाने **प्राकलने व आराखडे** (Plans & Estimates) तयार करण्यासाठी ग्रामसभेत ठराव करुन त्यांच्या मतानुसार **भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, सक्षम तंत्रविज्ञान महाविद्यालये / संस्था, जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, तांत्रिक ज्ञान असलेल्या शासन पॅनेलवरील सक्षम सेवाभावी संस्था किंवा खाजगी तंत्रज्ञ अथवा गावातील उपलब्ध सक्षम तंत्रज्ञ** यांच्याकडून ते तयार करुन घ्यावेत व **खर्च प्रथम ग्रामपंचायतीने / गावाने करावा.**

(ब) जिल्हा परिषदेअंतर्गत संबंधित यंत्रणेने ग्रामपंचायतींशी विचारविनिमय करुन किंवा इतर पर्यायी पध्दतीने तपासून या Plans, Estimates ला जी मंजूरी दिली असेल (दुरुस्तीसह अथवा त्या शिवाय) त्या **मंजूरीच्या रकमेच्या कमाल २% च्या अधीन** राहून जो प्रत्यक्ष खर्च प्राकलने व आराखडे तयार करण्यासाठी ग्रामपंचायतीने/ गावाने/ वाडीने केला असेल त्या खर्चाची १० प्रतिपूर्ती ग्रामपंचायतीने/ गावाने/ वाडीने उघडलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या स्वतंत्र खात्यात जिल्हा परिषदेमार्फत वर्ग करण्यात यावी. वरील यंत्रणेपैकी जी यंत्रणा किमान दराने काम करेल व कामाची गुणवत्ता राखेल त्यांनाच ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने हे काम द्यावे. २ % पेक्षाचा जादा खर्च ग्रामपंचायतीला / गावाला पूर्णपणे स्वनिधीतून / लोकवर्गणीतून करावा लागेल.

२) प्राकलने व आराखडे (Plans and Estimates) जिल्हा परिषदेकडे सादर करतांना गावाने पुढीलप्रमाणे निर्णय / ठराव सोबत सादर करावेत :-

(अ) ग्रामपंचायतीच्या / गावाच्या / वाडीच्या योजनेच्या सर्व बाबींचा **हिशेब ठेवण्यासाठी** गाव कोणास नेमणार आहे, त्याची अर्हता काय आहे, हे नमूद असावे. ( शक्यतो गावाने ग्रामसभेत गाव स्तरावरील स्वयंसेवी काम करण्यास

इच्छुक व हिशोबाची जाण असणा-या लाभधारकांपैकी एकाची निवड करावी. शिक्षण किमान एस.एस.सी. झालेले असावे. पाणी पुरवठा व स्वच्छता समितीवर नेमलेल्या पात्र सदस्यांपैकी, शक्यतो महिलेला या कामासाठी प्राधान्य देण्यात यावे, यासाठी येणारा आवर्ती खर्च गावाला देखभाल, दुरुस्ती निधीतून करावा लागणार आहे याची गावाने नोंद घेऊन ग्रामसभेची सहमती घ्यावी.)

(ब) गावाने ठरविलेल्या योजनेचे नियोजन, अंमलबजावणी व **तांत्रिक पर्यवेक्षण** (Technical Supervision, i.e., Project Management) गाव कोणाला सोपविणार आहे (भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, तंत्र महाविद्यालये, तांत्रिक ज्ञान असलेल्या अशासकीय स्वयंसेवी संस्था (NGO), खाजगी तंत्रज्ञ इत्यादी) याबद्दल नमूद असावे. तसेच ही निवड पारदर्शी पध्दतीने कशी करण्यात येईल हेही नमूद असावे. ही निवड करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने गावांना सहाय्य करावे जेणेकरुन सक्षम, किमान खर्चाचा व योग्य सेवा देणारा तांत्रिक पर्यवेक्षकच गावाकडून निवडला जाईल. यासाठी जिल्हा परिषदेने सक्षम तांत्रिक सेवा पुरवठादारांचे एक पॅनेल खुल्या व पारदर्शक पध्दतीने तयार करुन गावांना उपलब्ध करुन द्यावे. हे पॅनेल वेळोवळी अद्यावत करावे अथवा गावाकडून तक्रारी आल्यास चौकशी करुन या पॅनेलवरील तंत्रज्ञांना काळ्या यादीतही टाकावे. मात्र या पॅनेलवरील कोणत्या तंत्रज्ञाची निवड करावी याचा अंतिम निर्णय ग्रापंचायतीतील ग्रामस्थांचा / ग्रामसभेचा राहील याची दक्षता घ्यावी.

(क) लोकसहभागापैकी **रोख स्वरुपात** किती रक्कम गाव जमा करणार आहे याबद्दल स्पष्ट तरतूद असावी. (ही रोख रक्कम सर्वसाधारण क्षेत्रासाठी किमान ५ % तर आदिवासी क्षेत्रासाठी व दलित वस्ती कार्यक्रमासाठी किमान १ % पेक्षा कमी राहणार नाही. लोकसहभागाचा सर्वसाधारण क्षेत्रासाठी उर्वरित ५% तर आदिवासी क्षेत्रासाठी व दलित वस्ती कार्यक्रमासाठी उर्वरित ४ % भाग श्रमदान,वस्तुदान अथवा कौशल्यदान या स्वरुपात योजनेसाठी आवश्यक त्यावेळी भरण्याची मुभा असेल. मात्र हे श्रमदान, वस्तुदान व कौशल्यदान प्राकलन व आराखडे (Plans and Estimates) मध्ये नमूद असलेल्या योजनेला आवश्यक असलेल्या कामांपैकी असावे. यामध्ये श्रमदानाची किंमत काढताना, मजूरीचा दर किमान वेतन कायद्यापेक्षा जास्त धरता येणार नाही. श्रमदान कोण करणार याबाबत नमूद असावे. तसेच, रोख निधी, लाभधारकांचा आर्थिक स्तर पाहून किती प्रमाणात ते विविध घटकांकडून घेण्यात येणार आहे याबाबतही नमूद असावे.)

(ड) ग्रामसभेने जर योजनेत करावयाचे मजूरीचे काम गावातील मजूरीचे काम करणाऱ्या लाभधारकांकडून करुन घेण्याचे ठरविले असल्यास व त्यांना मिळणाऱ्या मजूरीतून त्यांच्या लोकसहभागापोटी काही रक्कम कापून घेण्याचा ठराव ग्रामसभेत केला असल्यास, अशी किती रक्कम कापून घेण्यात येईल याबद्दल स्पष्ट नमूद असावे.

(इ) श्रमदान न करणाऱ्यांकडून **किमान** वेतन दराने लोकवर्गणीची रोख रक्कम वसूल करण्याचाही ठराव सोबत असावा.

(ई) योजनेची अंमलबजावणी करताना कोणती कामे **कंत्राटदाराला देण्यात येतील**, कोणकोणत्या बाबी (goods & services) **गाव स्वतः खरेदी करुन कंत्राटदाराला पुरवठा करेल** किंवा **स्वतः काम करेल** याबाबी निर्णयात नमूद असाव्यात. खरेदी करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने** त्यांच्यातून नेमलेल्या उपगटांची नावे नमूद असावीत. कंत्राटदार नेमूनच सर्व कामे केली पाहिजेत असे गावांवर बंधन नाही याची नोंद घ्यावी. जी कामे गावातच कमी खर्चात व तंत्रशुध्द होऊ शकतात ती गावस्तरावर करण्याची ग्रामपंचायतीस पूर्ण मुभा आहे. मात्र पदाधिकाऱ्यांनी वैयक्तिक फायदयासाठी या सवलतीचा गैरफायदा घेतला तर त्यांचेवर कायदेशिर कारवाई (दिवाणी, फौजदारी व प्रशासकीय इत्यादि) त्वरित करण्यात यावी.

(फ) योजनेस आवश्यक **माल घेण्यासाठी** किंवा **सेवा उपलब्ध** करुन घेण्यासाठी जिल्हा परिषद अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडील कंत्राटदारांची यादी गाव वापरणार नसेल तर त्यापेक्षा स्वस्त व चांगली सेवा/माल उपलब्ध होण्यासाठी गाव अंमलात आणणार असलेल्या पध्दतीची (जसे जाहिर निविदा मागवून किंवा तीन कोटेशन मागवून इ.) माहिती नमूद असावी. गावातील सक्षम, तांत्रिक क्षमता असलेल्या महिला स्वयंसहाय्यता गटांना ते यापैकी जी कामे करु शकतील त्या मध्ये कामाची किमान किंमत व दर्जा राखून ग्रामसभेने ठराव केल्यास देण्यास प्रत्यवाय नाही.

३) **तांत्रिक पर्यवेक्षणाचा अनुज्ञेय खर्च** :- प्राकलने व आराखडया प्रमाणे (Plans and Estimates) मंजूर प्रकल्पखर्च किंवा योजनेवर अंतिमरित्या झालेला कामावरील प्रत्यक्ष एकूण खर्च यापैकी जी रक्कम कमी असेल त्या **खर्चाच्या ५% पर्यंत खर्च प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सल्ला यासाठीचे शुल्क** म्हणून गावास विहित पध्दतीने नेमलेल्या तांत्रिक पर्यवेक्षकाला अदा करता येईल. मात्र यासाठी पारदर्शी पध्दतीने ग्रामसभेत ठराव करुन नेमणुक झालेली असावी. मंजूर प्राकलने व आराखडयात या खर्चाचा समावेश करुन एकूण मंजूरीच्या ५ % रक्कम कमाल खर्चाचे अधीन खर्च करता येईल. या खर्चाच्या ९० % (आदिवासी व दलित भागात ९५ % ) निधी शासन उपलब्ध करुन देईल. त्यापेक्षा जादा खर्च केल्यास तो संबंधित गावास उचलावा लागेल. ही रक्कम योजनेच्या भौतिक कामाच्या टप्प्यांसाठी ज्याप्रमाणे व ज्यावेळी निधी देण्यात येईल त्याचवेळी यासाठी सुध्दा गावास जिल्हा परिषदेकडून वितरीत करण्यात यावी.

४) गावाने नेमलेल्या हिशोबनिसाला (Accountant) तसेच इतरांना घ्यावयाची आवश्यक प्रशिक्षणे, गावाला बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यापूर्वी पूर्ण करावी लागतील. प्रशिक्षणासाठी आवश्यक खर्च जिल्हा परिषदेने करावा. जिल्हा परिषदेने यासाठी वेळोवेळी प्रशिक्षण शिबिरे स्वतः किंवा सक्षम प्रशिक्षण संस्थेच्या सहाय्याने आयोजित करावी. यामुळे स्वयंरोजगारासही चालना मिळेल.

५) गावाला **शासन सहभागाचा निधी उपलब्ध करुन देण्यासाठी खालीलप्रमाणे टप्पे** असतील:

(अ) ग्रामपंचायत/ गाव/ वाडीस योजनेची प्राकलने व आराखडे (Plans and Estimates) तयार करण्यासाठी **मंजूर** प्राकलने व आराखड्याच्या (Plans and Estimates) रकमेच्या कमाल २ % रकमेच्या ९० % / ९५ % पर्यंत निधी अनुज्ञेय राहिल. ही रक्कम ग्रामपंचायतीच्या ग्रामपंचायत कायदा कलम ४९ अंथवा कलम ४९ अ अन्वये गठित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला जिल्हा परिषदेच्या पर्यवेक्षक तांत्रिक अधिका-यांची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या खात्यातून हे काम करणाऱ्या/ केलेल्या यंत्रणेला ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या ठरविलेल्या किमान दोन सदस्यांच्या (त्यापैकी किमान एक महिला असेल) सहयांच्या चेकव्दारे वितरीत करता येईल.

(ब) **प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सल्लागार शुल्क :-** मंजूर प्राकलने व आराखडे (Plans and Estimates) व दिलेली कंत्राटे यांच्या अधीन राहून प्रत्यक्ष खर्चाच्या ५% पर्यंत निधीच्या ९० % / ९५ % रक्कम करारात ठरल्यानुसार टप्प्याटप्प्याने संबंधित तांत्रिक सल्लागाराला ग्राम पंचायतीच्या पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने, सेवेची प्रत पाहून चेकव्दारे वितरीत करावी.

(क) एकूण प्रत्यक्ष कामाच्या खर्चाच्या २ % पर्यंत खर्च प्रशासकीय कामासाठी अनुज्ञेय राहील. यात मालखरेदीसाठीचा प्रवास खर्च, या योजनेच्या प्राप्त निधीचे हिशोब ठेवण्याचा व पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचा या योजनेच्या कामासाठीचा सभा खर्च हे अंतर्भूत राहतील.

(ड) शासन सहभागाचा ९० % / ९५ % **निधी** खालीलप्रमाणे देण्यात येईल:

i) रोखीने जमा करावयाच्या ठरविलेल्या रकमेपैकी सर्वसाधारण क्षेत्रासाठी किमान ५ % व आदिवासी क्षेत्रासाठी व दलित वस्ती कार्यक्रमासाठी किमान १ % लोकसहभागाची रोख रक्कम जमा केल्याबाबत बँकेचे प्रमाणपत्र सादर केल्यावर ८ दिवसात शासन सहभागाच्या रकमेपैकी (शासन सहभाग म्हणजे प्रत्यक्ष कामाची मंजूर रक्कम + २ % पर्यंत प्राकलने व आराखडे बनविण्याचा खर्च + ५ % तांत्रिक पर्यवेक्षण खर्च + २ % प्रशासकीय खर्च यासह होणा-या एकूण मंजूर रकमेच्या ९० % निधी सर्वसाधारण भागासाठी व ९५ % निधी आदिवासी व दलित वर्गीयांच्या योजनांसाठी असा राहील.) ४५ % निधी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या खात्यात जिल्हा परिषदेकडून जमा करण्यात येईल. या शासन निधीच्या हप्त्यातून व लोकसहभागाच्या जमा केलेल्या अशा एकूण जमा रकमेतून आवश्यकतेनुसार टेंडर देणे,खर्च हिशोबाच्या नोंदवहया खरेदी,विमा,प्रकल्प व्यवस्थापक तथा तांत्रिक सल्लागाराच्या शुल्काचा हप्ता, मालखरेदीसाठी प्रवासखर्च व वाहतूक खर्च, योजनेसाठी ग्रामसभेने ठरविल्याप्रमाणे कंत्राटदारास Mobilization Advance व झालेल्या

कामाचे शक्य तेवढे मंजूर running bill देण्यासाठी खर्च करता ये. गावाने/वाडीने मंजूर योजनेत ठरविल्याप्रमाणे या टप्प्यावर आवश्यक तेवढे वस्तुदान,श्रमदान व /किंवा कौशल्यदान केलेले असावे. (जोडपत्रातील अनुक्रमांक २ पहावा.)

ii) योजनेचे काम सुरु असतांना गाव /वाडीसाठी ठरविलेले असेल त्याप्रमाणे लोकसहभागाची उर्वरित रोख रक्कम ग्रामपंचायत स्तरावर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी. वरिल (i) मध्ये नमूद एकूण जमा रकमेपैकी किमान ९० % खर्च झाल्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रे ग्रामपंचायतीच्या ग्राम सामाजिक लेखा समितीच्या शिफारशीसह जिल्हा परिषदेस प्राप्त झाल्यानंतर योजनेसाठी द्यावयाच्या शासन सहभागाच्या रकमेपैकी आणखी ५० % रक्कम जिल्हा परिषदेकडून ग्राम स्तरावरील योजनेच्या बँक खात्यात ८ दिवसात जमा करण्यात येईल. यामधून तांत्रिक सल्लागाराचा ठरलेला उर्वरित हप्ता (कामाच्या टप्प्यानुसार), योजनेची पुढील कामे, विहित पध्दतीने सामुग्री खरेदी, मजूरी यावर व इतर मान्य बाबींवर खर्च करता येईल. या टप्प्यातही गावाने /वाडीने ठरल्यानुसार आवश्यक वस्तुदान, श्रमदान व /किंवा कौशल्यदान करावे. (जोडपत्रातील टप्पा ३ पहावा.)

iii) वरील (i) व (ii) मध्ये नमूद लोकसहभाग व शासन सहभागाच्या रकमेच्या १०० % खर्च झाल्यानंतर गावाने त्यांनी नेमलेल्या तांत्रिक सल्लागाराचे प्रमाणपत्र, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या सहीने व ग्राम सामाजिक लेखा परीक्षा समितीच्या प्रतिस्वाक्षरीने जिल्हा परिषदेकडे सादर झाल्यावर ८ दिवसात प्रत्यक्ष झालेल्या एकूण खर्चाच्या अधीन शासन सहभागाची उर्वरित ५ % रक्कम जिल्हा परिषदेकडून योजनेच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. शासनाचा सहभाग सर्वसाधारण क्षेत्रासाठी एकूण प्रत्यक्ष खर्चाच्या ९० % पेक्षा व आदिवासी क्षेत्रासाठी व दलित वस्ती कार्यक्रमासाठी एकूण प्रत्यक्ष खर्चाच्या ९५ % पेक्षा जास्त असणार नाही. उर्वरित शासन सहभागाचा ५ % पेक्षा जास्त आलेला खर्च आणखी लोकसहभागाची रक्कम जमा करुन गावासच करावा लागेल. या टप्प्यातही गावाने योजनेस ठरल्यानुसार आवश्यक वस्तुदान, श्रमदान व /किंवा कौशल्यदान करावे.

(इ) एकूण झालेला सर्व खर्च निश्चित केल्यानंतर, योजनेतील लाभधारक महिलांच्या महिला मंडळाचे अथवा ग्रामपंचायतीने मुंबई ग्रामपंचायत कायदा कलम ४९ अन्वये महिला विकास समिती गठीत केली असल्यास, या समितीचे काम समाधानकारक झाले आहे याबाबतचे ना हरकतपत्र प्राप्त झाल्यानंतर, गावाने नेमलेल्या तांत्रिक सल्लागाराचा अंतिम काम पूर्णत्वाचा दाखला प्राप्त झाल्यानंतर, जिल्हा परिषदेच्या तांत्रिक पर्यवेक्षकाने योजनेचे काम पूर्ण व गुणवत्तापूर्ण असल्याचे अंतिम प्रमाणपत्र दिल्यानंतर, योजनेचे गावाने नेमलेल्या सनदी लेखापालाकडून लेखा परीक्षण झाल्यानंतर व वरील सर्व बाबींची पूर्तता

झाली आहे याची खात्री करुन सामाजिक लेखा परीक्षण समितीने शिफारस केल्यानंतर योजनेचे काम पूर्ण झाले आहे असे समजण्यात यावे.

६. वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. या सूचनांची व प्रक्रियेची अंमलबजावणी न केल्यामुळे संबंधित गावाचे अथवा शासनाचे कोणतेही नुकसान झाल्यास संबंधित अधिकारी / पदाधिकारी यांस वैयक्तिक व सामुहिकरित्या जबाबदार धरुन कायदेशीर कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी. या मार्गदर्शक सूचनांबाबत कोणतीही अडचण निर्माण झाल्यास त्या अडचणींचे निराकरण करण्याचे अधिकार शासनास असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(सुधीर ठाकरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
जिल्हाधिकारी, (सर्व )
मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद (सर्व )
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व )
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
तहसीलदार ( सर्व )
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखा परीक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२, नागपूर (लेखा परीक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालयातील सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन पापु-०७.

| अ.क्र | टप्पा | लोकसहभाग (सर्वसाधारण क्षेत्रासाठी किमान १०% तर, आदिवासी क्षेत्रासाठी व दलित वस्ती कार्यक्रमासाठी किमान ५%) | | शासन सहभाग (सर्वसाधारण क्षेत्रासाठी कमाल ९०% तर, आदिवासी क्षेत्रासाठी व दलित वस्ती कार्यक्रमासाठी कमाल ९५% ) | | कामाचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रोख (पा.पु. व स्व.योजनेच्या खात्यात) | वस्तुदान/श्रमदान /कौशल्य दान (प्रत्यक्ष योजनेला) आवश्यक | उपलब्धता | अटी | | |
| १. | २. | ३.(अ) | ३.(ब) | ४.(अ) | ४.(ब) | ५. | ६. |
| १. | प्राकलने व आराखडे तयार करणे | **(अ) सर्वसाधारण क्षेत्रासाठी** किमान ३ % (सादर केलेल्या मंजूर प्राकलन रकमेच्या)<br>------------<br>**(ब) आदिवासी क्षेत्रासाठी व दलित वस्ती कार्यक्रमासाठी किमान १ %** (सादर केलेल्या मंजूर प्राकलन रकमेच्या) | (अ)गावस्तरावरील तज्ञांचे कौशल्य दान<br>------------<br>(ब)आदिवासी पाडा/दलित वस्ती स्तरीय तज्ञांचे कौशल्य दान | --- | (अ)**सर्वसाधारण क्षेत्रासाठी** प्राकलने व आराखडे जिल्हा परिषदेकडे मंजूरीला सादर करतांना त्याच्या ३ % रक्कम जमा करुन या पैकी २% पर्यंत रक्कम प्राकलने व आराखडे तयार करणाऱ्यास अदा केल्याचा व उर्वरित रक्कम खात्यात जमा पुरावा अथवा एकूण ३ % जमा रकमेचे बँकेचे प्रमाणपत्र सादर करणे.<br>------------<br>**(ब) आदिवासी क्षेत्रासाठी व दलित वस्ती कार्यक्रमासाठी** प्राकलनें व आराखडे मंजूरीला सादर करताना त्याच्या १ % रक्कम रोख जमा करुन ती तयार करणाऱ्यास अदा केल्याचा पुरावा अथवा १ % जमा रकमेचे बँकेचे प्रमाणपत्र सादर करणे. | (अ)ग्राम सभेने ठरविलेल्या योजनेचे सर्वेक्षण करुन प्राकलने व आराखडे तयार करुन मंजूरीस्तव सादर करण्यासाठीचे शुल्क.<br>------------<br>(ब)आदिवासी क्षेत्रासाठी पाडा सभेने व दलीत वस्तीसाठी दलीत वस्ती स्तरीय लाभधारक उपसमितीने (मुंबई ग्रा.पं.अधिनियम१९५८ च्या कलम ४९ अ अन्वये गठीत)स्वतः अथवा यथास्थित ग्रामपंचायत स्तरीय ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने योजनेचे सर्वेक्षण करुन प्राकलने व आराखडे तयार करुन मंजूरीस्तव ग्रामपंचायतीमार्फत सादर करण्याचे शुल्क | ग्रामसभेने अथवा पाडा स्तरीय सभेने प्रथम ही रक्कम लोक वर्गणीतून जमा करुन प्राकलने व आराखडे करणाऱ्याला अदा करावी. ही रक्कम जि.प.कडुन मंजूर प्राकलने आराखडयाच्या रकमेच्या २% पेक्षा जादा नसावी. त्यापेक्षा जादा रक्कम गावाला अथवा लाभधारकांना जादा लोकसहभाग जमा करुन संपूर्ण अदा करावी लागेल शासन सहभाग २ % पर्यंतच्या खर्चाच्या ९० % (सर्वसाधारण क्षेत्र ) व ९५ % (आदिवासी व दलित क्षेत्र पुरता सिमित राहील. |
| २. | जि.प.च्या योजना मंजूरीनंतर , तसे गावाला कळविल्या-नंतर योजनेचे काम सुरु करताना. | **(अ) सर्वसाधारण क्षेत्रासाठी** किमान २% (सादर केलेल्या व जि.प.ने मंजूर प्राकलन रकमेच्या) किंवा ग्रामसभेने रोख सहभाग ५ % पेक्षा जादा ठरविलेला असलेला तेवढा एकूण खर्च<br>------------<br>**(ब)आदीवासी क्षेत्रासाठी व दलीत वस्ती कार्यक्रमासाठी** १ % पेक्षा जादा रोख रक्कम जमा करण्याचे ठरविले असल्यास ठरविलेप्रमाणे संपूर्ण रक्कम | **(अ)**मंजूर योजनेत गावाने ठरविल्याप्रमाणे आवश्यक तेवढे वा त्यापेक्षा जास्त<br>------------<br>**(ब)**मंजूर योजनेत पाडा/ दलीत वस्तीने ठरविल्याप्रमाणे जमा करावयाचा रोख रकमेचा एकूण भाग (क्र.१ मध्ये जमा झालेला वजा करता) उर्वरित (एकूण ५ % चे अधीन) आवश्यक किंवा त्यापेक्षा जास्त | ४५ % (योजनेसाठी उपलब्ध करुन द्यावयाच्या शासन सहभागाच्या रकमेपैकी) या शासन आदेशाचा परि.५ (ड) पहावा | (अ)**सर्वसाधारण क्षेत्रासाठी** योजना मंजूरीनंतर गावाने मंजूर प्राकलनाच्या आणखी किमान २ % रक्कम रोख जमा केल्याचे बँकेचे प्रमाणपत्र सादर केल्यावर ८ दिवसांत (म्हणजेच एकूण किमान ५ % रोख रक्कम जमा झाल्यावर)<br>------------<br>**(ब) आदिवासी क्षेत्रासाठी व दलित वस्ती कार्यक्रमासाठी** योजना मंजूरीनंतर गावाने मंजूर प्राकलनाच्या १ % रकमेपेक्षा जादा रोख रक्कम जमा करण्याचा निर्णय घेतला असलेस (५% चे अधिन ) अशी संपूर्ण जादाची रोख रक्कम जमा केल्याचे बँकेचे प्रमाणपत्र सादर केल्यावर ८ दिवसांत | गावाने जमा केलेल्या रोख रकमेतून व शासन सहभागातून उपलब्ध रकमेतून टेंडर देणे, खर्च हिशोबाची रजिस्टर्स खरेदी आदीची रक्कम, विमा, प्रकल्प व्यवस्थापक तथा तांत्रिक सल्लागाराच्या शुल्काचा हप्ता, मालखरेदी, त्याचा वाहतूक खर्च , प्रवासखर्च , योजनेसाठी ग्रामसभेने ठरविल्याप्रमाणे कंत्राटदारास Mobilization Advance व रकमेतून शक्य तेवढे कामाचे running bill देण्यासाठी खर्च करता येईल. | एकूण उपलब्ध रोख रकमेच्या (लोक सहभाग + शासन सहभाग) किमान ९०% खर्च झाल्याचे ग्रामपंचायतीने नेमलेल्या तांत्रिक सल्लागाराचे प्रमाणपत्र व ग्राम सामाजिक लेखा परिक्षा समितीच्या प्रतिस्वाक्षरीने जि.प.कडे प्राप्त झाल्यावर पुढील टप्पा ३ मधील हप्त्याची रक्कम देण्याचा विचार |

| अ. क्र | टप्पा | लोकसहभाग (सर्वसाधारण क्षेत्रासाठी किमान १०% तर, आदिवासी क्षेत्रासाठी व दलित वस्ती कार्यक्रमासाठी किमान ५%) | | शासन सहभाग (सर्वसाधारण क्षेत्रासाठी कमाल ९०% तर, आदिवासी क्षेत्रासाठी व दलित वस्ती कार्यक्रमासाठी कमाल ९५% ) | | कामाचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रोख (पा.पु. व स्व.योजनेच्या खात्यात) | वस्तुदान/श्रमदान /कौशल्य दान (प्रत्यक्ष योजनेला) आवश्यक | उपलब्धता | अटी | | |
| १. | २. | ३.(अ) | ३.(ब) | ४.(अ) | ४.(ब) | ५. | ६. |
| ३. | योजना काम सुरु असताना. | ग्रामसभेने ठरविल्याप्रमाणे उर्वरित संपूर्ण रोख भाग, आदिवासी पाडा किंवा दलीत वस्तीसाठी ठरविले प्रमाणेच आवश्यक उर्वरित रोख भाग | मंजूर योजनेत गावाने /पाडयाने/दलीत वस्तीने ठरविल्याप्रमाणे आवश्यक तेवढे वा त्यापेक्षा जादा | ५० % (योजनेसाठी उपलब्ध करून द्यावयाच्या शासन सहभागाच्या रकमेपैकी) | वरील क्रमांक २ प्रमाणे शे-यांची पूर्तता झाल्यावर | तांत्रिक सल्लागाराचा ठरलेला हप्ता (कामाचे टप्प्यानुसार), योजनेची पुढील कामे, सामुग्री खरेदी (विहित पध्दतीने व त्याचा प्रवासखर्च), मजूरी. | एकूण टप्पा २ व ३ मधील उपलब्ध एकूण लोकसहभाग + शासन रकमेच्या १००% खर्च झाल्यानंतर गावाने नेमलेल्या तांत्रिक सल्लागाराचे प्रमाणपत्र व ग्राम सामाजिक लेखा परीक्षा समितीच्या प्रतिस्वाक्षरीने जि.प.कडे सादर झाल्यावर ८ दिवसांत प्रत्यक्ष झालेल्या एकूण खर्चाच्या अधीन टप्पा ४ मध्ये नमूद उर्वरित ५% रक्कम अदा करावी. (परी.५ (इ)पहावा) |
| ४. | योजनेचे काम पूर्ण झाल्यावर | --- | मंजूर योजनेत गावाने ठरविल्याप्रमाणे आवश्यक तेवढे वा त्यापेक्षा जादा | ५% (योजनेसाठी उपलब्ध करून द्यावयाच्या शासन सहभागाच्या रकमेपैकी ) | प्रत्यक्ष एकूण खर्चाचा विचार करुन ५% पर्यंत रक्कम अदा करणेत येईल.शासनाचा सहभाग सर्वसाधारण क्षेत्रासाठी एकूण प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% पेक्षा व आदिवासी क्षेत्रासाठी व दलित वस्ती कार्यक्रमासाठी एकूण प्रत्यक्ष खर्चाच्या ९५% पेक्षा जास्त असणार नाही. उर्वरित ५% पेक्षा जादा खर्च आलेला गावाने लोकवर्गणीतून जादा रोख रक्कम जमा करुन करावा लागेल. | काम पूर्ण झाले असावे, सर्व हिशोब पूर्ण केले असावेत, लेखा परीक्षण झाले असावे, योजना कार्यान्वित झाली असावी. सामाजिक लेखा परीक्षण समितीने शिफारस केली असावी व जिल्हा परिषदेने नेमलेल्या तांत्रिक अधिका-याने तपासणी करुन काम पूर्ण व गुणवत्तापूर्ण असल्याचे प्रमाणपत्र दिल्यावर (परी ५ (इ)पहावा) | |

टिप:- (१)योजनेचे प्राकलने व आराखडे तयार करताना त्यात प्रत्यक्ष काम[illegible]न खर्चाशिवाय २% प्राकलने व आराखडे खर्चआणि ५ % प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सल्ला व २ % प्रशासकीय खर्च अंतर्भूत असेल.